RNI Reg. No : MAHMUL/2015/74000

ISSN : 2395 - 759X

# AKANKSHA..... New Directions & Challenges

# आकांक्षा..... नवी दिशा आणि आव्हाने

# आकांक्षा..... नई दिशा और आव्हाने

**Vol.VI, Issue XII, December 2020**

No part of this Journal may be reproduced in any form, by Photostar, Microfilm, Xerography, Of any other means, of incorporated into any information reteieval system, electronic or mechanical, without the written permission of the Author, Editior-In-Chief and the Publisher of this Journal.

Copyright © 2015 by. Prof. Mayur B. Lahane
Inc. All Rights Reserved

**Powered By**

**Editor-In- Chief**
**Mayur Lahane**

**Published By**

Akanksha Tankalekhan Mutipurpose Society.
Near Ram Mandir, Peth pura,
At. Post. Hiwarkhed
Tq. Telhara Dist. Akola Maharashtra 444103
Cont :- 9096593842

# Index

**Sr. No.** **Contents** **Page No.**

1. **Primary teachers' attitudes towards and beliefs about mathematics teaching: the collective culture of one English primary school.**
**- Dilip Tulashiram Tirkar** १–१३

2. **Gharanas-The origins, Development and present scenario: In the context of Tabla**
- Dr. Kedar Ravindra Mukadam १४–२५

३. **गाडगेबाबांच्या कीर्तनातील बुध्दीप्रामाण्यवाद**
– प्रा. मुकेश भा. सरदार २६–२८

An International Indexed, Refereed, Peer Reviewed, Interdisciplinary, Multilingual, Multisubject Monthly Research Journal.
Vol. VI, Issue XII, December 2020
ISSN : 2395-759X

# ३. गाडगेबाबांच्या कीर्तनातील बुध्दीप्रामाण्यवाद

प्रा. मुकेश भा. सरदार
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय चिखलदरा.
जि. अमरावती – ४४४८०७

महाराष्ट्र भूमी ही संताची भूमी म्हणून ओळखली जाते. संत ज्ञानेश्वर आणि त्यांच्या प्रभावळीतील संतांनी भक्ती मार्गाबरोबरच समाजप्रबोधनही केले. अशा संतांची दैदित्यमान अशी परंपराच सांगता येईल. अलिकडे विदर्भातही दोन महान संत होऊन गेले. राष्ट्रसंतानी खंजीरीच्या माध्यमातून ग्रामगीता सांगितली तर कीर्तनाच्या माध्यमातून समाज चिंतक गाडगेबाबांनी प्रबोधनाचे स्वर काढलेत.

गाडगेबाबांचा जेव्हा जन्म झाला (२३/२/१८७६) तेव्हा तो काळ थोडा विचित्र आणि विक्षिप्त म्हणावा लागेल. अनिष्ट प्रथा परंपरांना बहराचे दिवस होते. समाजातील लोक अडाणी आणि अशिक्षित होते. दिवसभर कष्ट करायचे, मर-मर मरायचे आणि सायंकाळी आपला थकवा दूर करण्यासाठी सहज दारुभट्टीचा आश्रय घ्यायचे. त्याचे बळी गाडगेबांबाचे वडील झिंगराजी ठरले. दारु पिण्यामुळे त्यांचे लिकर बिघडले त्यामुळे त्यांचा १८८४ मध्ये देहांत झाला. वयाच्या दहाव्या वर्षी सखुबाई आणि डेबू सर्व अर्थाने पोरके झाले. या घटनेचा गाडगेबांबावर फार मोठा परिणाम झाला. ते विचार करायला लागलेत आणि इथेच त्यांच्या ठिकाणी बुद्धिप्रामण्यवादाचा जन्म झाला.

बुद्धिप्रामाण्यवादाचा पूर्व इतिहास जर पाहिला तर महाकारुणिक गौतम बुद्धाजवळ उगम पावणारी भारतीय बुद्धिप्रामाण्यवादाची धारा ही म. जोतीरावांजवळ येण्यापूर्वीच भारतीय समाजावकाशात परिलुप्त झालेली होती. मधल्या काळात तो काळ लुप्त झाला होती, याचा विचार करताना आपणाला असे आढळेल की, कबीरासारख्या एखाद्याच बुद्धिप्रामाण्यवादी संताचा अपवाद करता भारतभर उभी राहिलेली संतांची भक्ती चळवळ आणि या भक्ति चळवळीच्या केंद्रस्थानी देव हीच संकल्पना कार्यरत असलेली आढळेल. बुद्धाने नसलेल्या ईश्वराचे अस्तित्व नाकारले म्हणूनच त्याच्यापासून खरा बुद्धिप्रामाण्यवाद अस्तित्वात आलेला दिसेल. कोणीही असे सिद्ध करू शकत नाही की, ईश्वराने है सर्व जग रचले, जग हे रचले नसून विकास पावलेले आहे. हाच निष्कर्ष कर्मयोगी गाडगेबाबा सुद्धा काढतात ते म्हणतात. पृथवी पैदा झाली तेवा पासून देव कुणी पाहिला नाही देव काही पायाची वस्तू नाही असे सांगून आपण बुद्धिप्रामाण्यवादी असल्याचे सिद्ध केले. शीलाचे पालन केल्यामुळेच सर्व सुखे प्राप्त होतात हे गाडगेबांबानी ओळखले होते म्हणूनच ते आपल्या कीर्तनातून व्यसनापासून

An International Indexed, Refereed, Peer Reviewed, Interdisciplinary, Multilingual, Multisubject Monthly Research Journal.
Vol. VI, Issue XII, December 2020
ISSN : 2393-759X

दूर राहण्याचा सल्ला देत होते. आपल्या इंद्रियांचे रक्षण करणे आणि त्याला योग्य वळण लावणे, जे कुशल आहे ते ते करणे अशा व्यक्तिला शीलवान समजण्यात येते. शीलवान व्यक्तीची किर्ति पसरते, तो ज्या-ज्या सभेत जाती तेथे तेथे तो निःसंकोच व निर्भय होऊन जातो. मृत्यू प्रसंगी तो सुखपूर्वक व जाणीवपूर्वक मृत्यू पावतो. मृत्यू नंतर तो सुगती प्राप्त करतो. ह्या सगळ्या सुपरिणामाची जाणीव गाडगेबांवाना असल्यामुळे ते दारु पिणाऱ्या माणसाला म्हणतात 'तुझा सत्यानाश होईल!' 'सत्यानाश होऊ नये असे वाटत असेल तर तुम्ही कोणतेच व्यसन करु नये असे पोटतितिकीने गाडगेबाबा आपल्या कीर्तनातून लोकांना सांगत असत. 'बीज बोय बबूलके, आम कहाँसे आये ?"

चांगल बागा, सत्कर्म करा. अनीती सोडा, कोणावर अन्याय करु नका. कीर्तनात श्रोत्यांना बाबा विचारतात. माणसाले तोंड कायले देल्लं? दारु प्यायले ? मायबाप हो देव तीथीत नाई, मूर्तीत नाई, रानावनात नाई, त्याचीच जीवाभावानं सेवा करा, भुकल्याले अन्न, तान्हेल्याने पाणी द्या. उघडयानागडयांना वस्त्र द्या. बेघराले आसरा द्या. बेकाराईले रोजगार, दुःखी, निरास झाल्या लोकाइले हिम्मत द्या. गरीब मुलांच शिक्षण करा गरिबाईच्या लग्नाले मदत द्या. अंधपंगू-रोग्याइले औषध अन् मुक्या प्राण्याइले अभय द्या. कोणत्याही धर्मशाळेच्या फलकावर बाबांचा हा रोकडा धर्म वाचायला मिळतो. कारण बुद्‌धिप्रामाण्यवादी व्यक्ती हा अगाध करुणावंत असतो. त्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे हा रोकडा धर्म होय. सिद्‌धार्थ बुद्‌ध जगाला आर्य सत्य, पंचशील, आर्य अष्टांगिक मार्ग देतो तर गाडगेबाबा त्याचेच दुसरे रुप म्हणजे रोकडा धर्म देतो. बाह्यार्थाने गाडगेबाबा बेडे पिसे वाटतात. परंतु हा माणूस अंतरी खूप शहाणा होता असेच म्हणावे लागेल. राष्ट्रसंतांना तर मानवतेचे मूर्तिमंत आदर्श वाटत होते. गाडगेबाबा आपल्या स्वतःच्या मुलीला गौरक्षणात राहू देत नाही तिला हाकलून लावतात. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपली चौखामेळा संस्था दान करतात. यातच त्यांच्या दूरदृष्टीची बुद्‌धिप्रामाण्यवादी तळमळ दिसते.

राष्ट्रीय एकात्मता, निरक्षरता, जातीयता, व्यसनाधिनता अशा राष्ट्राला पोखरणाऱ्या विषयाचे स्पष्टीकरण करतांना ते वैज्ञानिक दृष्टीचा आधार घेऊन गांभीर्य आपल्या कीर्तनातून पटवून देत होते, समतेचे बीज लहापणीच डेबूच्या अंगी होते. गुरे चारताना प्रत्येक जण शिदोरी आणत असे. डेबू सर्वांच्या शिदोऱ्या एकत्र करून सहभोजन घेत होते. त्यांचे मित्र अनेक जातीचे होते. डेबूने जातीभेदाला महत्त्व न देता माणसात बंधूभाव निर्माण केला. बाबा आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत समाजासाठी झटत राहिले.

गाडगेबाबांनी आयुष्यभर कीर्तनाच्या माध्यमातून बुद्‌धिप्रामाण्यवादी विचार, प्रगतीच्या पथावर नेणारे विचार, समाजाला अज्ञान व अंधश्रद्‌धेच्या खाईतून वर काढणारे विचार लोकांच्या भाषेत लोकांकडूनच वदवून घेतले. गाडगेबाबा म्हणजे खरे लोकसंत होते असेच

An International Indexed, Refereed, Peer Reviewed, Interdisciplinary, Multilingual, Multisubject Monthly Research Journal.
Vol. VI, Issue XII, December 2020
ISSN : 2395-759X

म्हणावे लागेल. देव दगडात नसून तो माणसात आहे. त्याची सेवा करा. समाजात पिडलेल्या अशिक्षित समाजाला उभे करण्याचे काम बाबांनी अहोरात्र केले. गाडगेबाबा म्हणजे चालते बोलते नालंदा. तक्षशिला विद्यापीठच होते. बुद्धिप्रामाण्यवादाचे आश्रयालय होते.

**समारोप**

बुद्धिप्रामाण्यवादी म्हणजे बुद्धिलाच प्रमाण (खरे) मानणारा. तुमच्या बुद्धिला पटत असेल तर माझे तत्त्वज्ञान स्वीकारा अन्यथा स्वीकारू नका असे स्वातंत्र्य जगात पहिल्यांदा बुद्ध देतो. तर गाडगेबाबा स्वच्छतेच्या माध्यमातूनः माणसांची मने धुवून काढतात. गाडगेबाबाच्या पूर्वजांना लोकांचे कपडे धुण्याचेच काम केले. तर गाडगेबाबांनी माणसातील अकुशल विचार धुवून काढले. यासाठी बुद्धि प्रामाण्यवादाची साबण वापरुन संत कबीर, संत तुकारामाला आपला आदर्श मानून मनापासून जनसेवा केली.

बौद्ध विचारसरणीनुसार ज्ञानाचे चार भाग असून गाडगेबाबा तृतीय ज्ञानापर्यंत पोहचले होते असे निश्चित म्हणता येईल. ही अवस्था म्हणजे अनागामी अवस्था होय. या अवस्थेत चारपरम सत्याचे ज्ञान पूर्वीपेक्षा अधिक स्पष्टपणे होते. या अवस्थेत शाश्वत दृष्टी विचिकित्सा, काम तृष्णा व व्यापाद (प्रतिहिंसा) या सयोजनांचे समूळ उच्चाटन झालेले असते. अनागामी फळ प्राप्त व्यक्तिची रुप भूमीत किंवा अरुप भूमीत पुन्हा एकदा प्रतिसन्धी होऊन, जन्म होवून तेथे ही व्यक्ती निर्वाण प्राप्त करते. अनागामी व्यक्तीचे चित्र कधीही प्रततोन्मुख होत नाही. त्याचे चित्त अकुशल कार्य करु शकत नाही. तो काम भूमीत पुन्हा आगमन न करणारा असल्यामुळे त्याला अनागामी असे म्हटल्या जाते. गाडगेबांबाच्या एकूण व्यक्तिमत्वाचा, कार्याचा अभ्यास केल्यास निश्चित ते अनागामी फळाचे हक्कदार ठरतात. कारण त्यांनी आयुष्यभर बुद्धिप्रामाण्यवादी विचार मांडला व केला. थोडक्यात कर्मयोगी संत गाडगेबाबाच्या अनुयायांनी त्यांनी दाखविलेल्या बुद्धि प्रामाण्यवादी रस्त्याने जाण्याची नितांत आज गरज आहे.

संदर्भ ग्रंथ

१. विसुद्धी मन भदन्ततिस्सवंस (सुगत प्रकाशन) नागपूर १७

२. संत गाडगेबाबा व्यक्ती आणि कार्य, डॉ. सौ. उषा वेरुळकर मेधा पब्लिकशन अमरावती ३. वाढण-वाढ-वा-माय, प्रमोद पुरुषोत्तम रोहणकर, संकेत प्रकाशन हातरुण जि. अकोला.

४. बुद्धिप्रामाण्यवादी पहिले समर्थक क्रांतीबा जोतीराव फुले बबन लव्हात्रे - डॉ. आंबेडकर बौद्ध विद्यापीठ प्रकाशन नागपूर-२६